# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.09.2024** **वारःशनिवार**

---

1. विश्वकर्मा योजना म्हणजे देशातली प्राचीन कौशल्यं, विकसित भारतासाठी उपयोगात आणण्याचा पथदर्शी आराखडा असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. पंतप्रधानांच्या हस्ते राज्य सरकारच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचा तसंच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेचा प्रारंभ
3. आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त आज राज्यात सागरी किनारा स्वच्छता मोहीमेचं आयोजन
4. जालना जिल्ह्यात रस्ते अपघातात सहा जणांचा मृत्यू आणि
5. चेन्नई कसोटी क्रिकेटच्या दुसऱ्या दिवशी भारताला 308 धावांची आघाडी, बांग्लादेश संघाचा पहिला डाव 149 धावांत आटोपला.

**<u>पंतप्रधान-विश्वकर्मा योजना</u>**

विश्वकर्मा योजना म्हणजे देशातली प्राचीन कौशल्यं विकसित भारतासाठी उपयोगात आणण्याचा पथदर्शी आराखडा आहे. असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल वर्धा इथं राष्ट्रीय पीएम विश्वकर्मा कार्यक्रमात बोलत होते. विश्वकर्मा योजनेबाबत पंतप्रधान म्हणाले,

यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते राज्य सरकारच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजना आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेचा प्रारंभ करण्यात आला. पीएम विश्वकर्मा लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि कर्जवितरण करण्यात आलं. तसंच या योजनेच्या वर्षपूर्तीनिमित्त विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं.

अमरावती इथल्या पीएम मित्रा अर्थात पीएम मेगा इंटीग्रेटेड टेक्सटाइल रिजन्स अँड ऍपेरल या उद्योग संकुलाची पायाभरणी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात आली. वस्त्रोद्योगात भारताला जागतिक बाजारपेठेत सर्वोच्च स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत असं मोदी यांनी सांगितलं. सरकार देशभरात 7 पीएम मित्रा उद्योग संकुलं उभारणार असून वस्त्रोद्योगातलं देशाचं गतवैभव पुन्हा मिळवून देणं हे सरकारचं उद्दीष्ट आहे. अमरावतीतलं वस्त्रोद्योग संकुल हे त्या दिशेनं टाकलेलं महत्त्वाचं पाऊल असल्याचं मोदी म्हणाले.

या कार्यक्रमाला केंद्रिय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जीतन राम मांझी, कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्यासह राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते.

परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा योजना अत्यंत महत्त्वाची आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. बलुतेदार समाजसमुहाच्या जीवनात परिवर्तन घडवण्याची मोठी संधी या योजनेमधून उपलब्ध झाल्याचं उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. तर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पीएम मित्रा पार्कमुळे पांढऱ्या सोन्याला खऱ्या अर्थानं सोन्याचे दिवस येणार असून त्यामुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. राज्यातल्या विविध जिल्ह्यांमधल्या महाविद्यालयांत स्थापन केलेल्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचं उद्घाटन काल स्थानिक लोकप्रतिनिधी तसंच राज्यातल्या मंत्र्यांच्या उपस्थितीत झालं.

**किनारपट्टी स्वच्छता**

आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त नागरिकांमध्ये सागरी प्रदूषणाविषयी जागरुकता निर्माण करणं आणि स्वच्छतेचं महत्त्व पटवून देणं यासाठी आज मुंबईत जुहू किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यामध्ये सहभागी होणार आहेत. लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, युवा संघटना, राष्ट्रीय छात्र सेना, सागरी सुरक्षा दलदेखील यात सहभागी होतील. देशातल्या किनारपट्टीवरच्या सर्व 13 राज्यांमध्ये आज ही स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. राज्यातही सागरी किनाऱ्यावरील सर्व जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीनं सागरी किनारा स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे.

**गडकरी**

आयुर्वेद आणि योगविज्ञान ही भारताची मोठी शक्ती आहे. भारतीय समृद्ध संस्कृती, इतिहास आणि वारसा यामुळेच संपूर्ण जग आपल्याकडे अपेक्षेनं पाहात आहे असं मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं. ते काल नागपूरमध्ये श्री विश्व व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. आगामी काळ आयुर्वेदासाठी अनुकूल असून आयुर्वेदात आधुनिक दृष्टिकोन आणि डिजीटल पायभूत सुविधा निर्माण करणं आवश्यक असल्याचं गडकरी म्हणाले. दरम्यान नितीन गडकरी कालपासून पुणे भेटीवर असून त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**रक्षा खडसे**

विकसित भारत योजनेमध्ये युवा पिढीचा मोठा सहभाग अपेक्षित आहे; सशक्त आणि सुरक्षित देशाच्या निर्मितीसाठी युवा पिढीचा हातभार लागावा, अशी अपेक्षा केंद्रीय क्रीडा राज्य मंत्री रक्षा खडसे यांनी काल पुण्यात व्यक्त केली. 'माय भारत'च्या माध्यमातून युवा पिढीने राजकारणाच्या क्षेत्रात चमकदार कामगिरी करावी; असंही त्यांनी सूचित केलं. विश्वकर्मा इन्स्ट्यिटूट ऑफ टेक्नॉलॉजी इथं 'विकसित भारत ॲम्बॅसेडर : युवा कनेक्ट' उपक्रमा अंतर्गत आयोजित विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पुण्यातील टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयातही काल खडसे यांच्या उपस्थितीत युवा कनेक्ट उपक्रम झाला. यावेळी, एक पेड मां के नाम; या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या आवारात रक्षा खडसे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं.

**महिला सुरक्षा कार्यशाळा-सोलापूर**

विद्यार्थ्यांना शैक्षणिक परिसरात मनमोकळेपणानं वावरता यावं म्हणून निर्भय आणि मुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा असं आवाहन राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचे मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी केलं आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसंच उच्च आणि तंत्र शिक्षण विभागातर्फे आयोजित 'महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते काल दूरस्थ माध्यमातून बोलत होते. महिला सुरक्षेच्या अनुषंगानं विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचं पालनही शैक्षणिक संस्थांनी करावं असं त्यांनी सांगितलं. कुलगुरु डॉक्टर सुरेश गोसावी यांच्या हस्ते या कार्यशाळेचं उद्घाटन झालं.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आयोजित महिला सुरक्षा कार्यशाळेचं उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांच्या हस्ते झालं. कामाच्या ठिकाणी आणि सार्वजनिक जीवनात वावरताना महिलांनी आपल्या सुरक्षिततेविषयी काळजी घ्यावी. अन्याय सहन न करता त्याविरुद्ध लढण्यास शिकावं आणि यासंदर्भातल्या कायद्यांविषयी साक्षर बनावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**अपघात-जालना**

जालना जिल्ह्यात शहापूर गावाजवळ काल झालेल्या बस आणि ट्रकच्या अपघातात 6 जणांचा मृत्यू झाला असून 23 जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये बस आणि ट्रकच्या चालकांसह 3 प्रवाशांचा समावेश आहे. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार केले जात आहेत.

**मालविका**

चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतलं मालविका बनसोडचं आव्हान संपुष्टात आलं आहे. जपानच्या आकाने यामागुची हिनं मालविकाला उपांत्यपूर्व फेरीत दोन सलग गेममध्ये हरवत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

**क्रिकेट**

भारत आणि बांग्लादेश क्रिकेट संघांमध्ये चेन्नई इथं सुरू असलेल्या कसोटी सामन्यात काल दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या 3 गडी बाद 81 धावा झाल्या होत्या. रिषभ पंत 12 आणि शुभमन गिल 33 धावांवर खेळत आहेत. तत्पूर्वी भारतानं आपल्या पहिल्या डावात 374 धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देताना बांग्लादेशचा संघ केवळ 149 धावाच करू शकला. त्यामुळे भारताला 308 धावांची आघाडी मिळाली. जसप्रीत बुमराहनं 4 तर मोहम्मद सिराज, आकाशदीप आणि रविंद्र जडेजा यांनी बांग्लादेशच्या प्रत्येकी 2 फलंदाजांना बाद केलं.

**हवामान**

राज्यातल्या सर्व विभागांमध्ये आज तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.